11

# गृह विज्ञान आणि स्वयंरोजगार

**मनीषा महारुद्र गाडवे**
गृहविज्ञान विभाग,
वसंतदादा पाटील महाविद्यालय,
पाटोदा जि. बीड

## Research Paper - Home Science

**प्रस्तावना :**

२१ व्या शतकात स्त्रियांनी विकासाचे दिशाने भरारी घेतली आहे.कारण पुरुषांप्रमाणे तिला विकासाची संधी (तात्विकदृष्ट्या) मिळाली आहे. परंतु वाढत्या बेरोजगारीच्या काळात स्थायी स्वरूपाची नोकरी मिळणे कठीण झाले आहे.अशा परिस्थितीत ग्रहणी किंवा भावी ग्रहीणी आपला घर हा प्रमुख व्यवसाय सांभाळत असताना आपल्या कुटुंबाकरिता काही आर्थिक मदत करता येईल या विचाराने स्वयंरोजगाराकडे वळत आहेत.

**पंडित नेहरुजींच्या मते –**

"केवळ पुस्तकी शिक्षण हे आदर्शाच्या प्राप्तीकरिता असफल ठरते. शिक्षणातून व्यक्तिमत्व आणि उत्पादकत्व यांचा विकास झाला पाहिजे, कुटुंब चालविण्याची आपली भागीदारी समर्थपणे पेलण्याची ताकद तिला शिक्षणातून मिळवयास पाहिजे".

या विधानाचा आधार घेता गश्हविज्ञान / गृहअर्थशास्त्र विषयाच्या विविध शाखांतून स्वयंरोजगार उपलब्ध करून ग्रहणीमध्ये सक्षमीकरण साधल्या जाऊ शकते. कारण ग्रहविज्ञान / ग्रहअर्थशास्त्र हा विषय जीवनाच्या प्रत्येक टप्प्याशी नाते जोडणारा आहे . स्वयंरोजगाराच्या विविध वाटा या विषयात समावलेल्या आहे.

**स्वयंरोजगार म्हणजे काय?**

लेखिकेच्या मते – एखादी व्यक्ती आपले ज्ञान, कौशल्य,वेळ, शक्ती तसेच आर्थिक आणि मानसिक / भावनिक गुंतवणूक विशिष्ट उद्दिष्ट गाठण्यासाठी करते. ज्याचा उद्देश केवळ 'टाईमपास जॉब नसून खर्ची घातलेल्या संसाधनांचा मोबदला पैशाच्या स्वरूपात प्राप्त करणे होय.याला स्वयंरोजगार म्हणता येईल.

**स्वयंरोजगार काळाची हाक—**

वाढती महागाई बेरोजगारी चे प्रत्येक क्षेत्रात वाढते प्रमाण सतत वाढणाऱ्या गरजा,जीवनस्तर उंचावण्याची इच्छा, शिक्षणाच्या भरमसाठ प्रवेश फी, या सर्व बाबीचा वेळ घालणे कुटुंबात एकट्य कमावत्या व्यक्तीची तारेवरची कसरत आहे.

**ग्रहविज्ञान विषयाची स्वयंरोजगार दृष्टिकोनातून व्यक्ती**

ग्रहविज्ञान हा जीवनाशी सांगड घालणारा उपयोजनशील (Applied Science) विषय असल्यामुळे मानवाच्या गरजेची पूर्ती करण्याची क्षमता या विषयात आहे. थोडक्यात गश्हविज्ञान स्वयंरोजगाराच्या दृष्टिकोनातून जीवनव्यापी आहे .म्हणूनच ग्रहविज्ञान विषय शिकलेल्या,गश्हविज्ञान पदवी, स्नातकोत्तर शिक्षण घेतलेल्या ग्रहीणी भावी गश्हिणी स्वयंरोजगार करू शकतात तसेच इतरांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देऊ शकतात.

ग्रह विज्ञान आणि स्वयंरोजगाररू

या स्वयंरोजगारासंबंधी थोडक्यात परिचय करून घेऊ.

**१. अन्न उद्योग (ध्ववक प्दकनेजतरू)**

आहारशास्त्र आणि पोषण शास्त्राशी संबंधित स्वयम रोजगार करता येतो. त्यापैकी

(अ) खाद्य पदार्थ करून विकणे. (ब) दीर्घकाळ टिकणारी पदार्थ तयार करणे.

(क) डबाबंद पदार्थ विकणे.

(इ) आहारोपचार पुरविणे. असे अन्न व्यवसायाशी संबंधित स्वयंरोजगार करू शकतात.

(अ) खाद्यपदार्थ करून विकणेरू आज ग्रहण यांच्या जीवनातील व्यक्त झाले आहे नोकरी आणि घर असा प्रपंच साधन असतात स्वत:वरचा ताण कमी करण्याच्या दृष्टीने रेडिमेड खाद्यपदार्थ घेण्याची प्रवश्त्ती दिवसेंदिवस वाढत आहे मोठ्य शहरांतून रेडिमेड खाद्यपदार्थांना चांगली ग्राहकांचा प्रतिसाद मिळत आहे. दिवाळी दसरा किंवा इतर सणावाराला खाद्यपदार्थ तयार करून ग्राहकांपर्यंत पोहोचविले जातात. स्वयंपाक ही एक कला आहे आनंददायी बाब आहे थोड कौशल्य असले की हा स्वयंरोजगार भरभराटीस निश्चितच येऊ शकतो. लाडू बर्फी, रसगुल्ले, गुलाबजाम नेत्या आवडीने करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. जर गृहिणीला विशिष्ट पदार्थाची कौशल्य नसेल तर एक्सपर्ट व्यक्तीकडून ते रोजगार तत्त्वावर करून घेता येते. त्यामुळे ग्रहणाचा वेळ वाचतो. तणाव कमी होतो. शिवाय हमखास पदार्थ चांगला मिळेल याची खात्री असते. ग्रह विज्ञान विषय स्वयंरोजगाराचे ज्ञान तर देतेच याशिवाय स्वयंरोजगार करिता मानसी तयार करून देते.

विविध क्षेत्रात स्वयंरोजगाराची उभारणी करता येते.

(प) रेडीमेड कपडे यांचा पुरवठा करणेरू अलीकडे लहान मुलांचे / युवकांचे इतकेच नव्हे तर प्रौढ व्यक्तीदेखील

रेडिमेड कपड्यांच्या प्रामुख्याने वापर करीत असल्याचे दिसून येते.ग्रह विज्ञान शिक्षण घेतलेली विद्यार्थिनी बाळाचे कपडे,सलवार,कमीज असे कपडे शिवू शकते. रेडीमेड कपड्यला भारतात तसेच विदेशातील मागणी आहे .राजस्थानी ड्रेससचे अमेरिकन मुलींना आकर्षण आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत देखील स्वयंरोजगारातून तयार कपडे आपले स्थान निश्चित करते.प्रत्येक शाळेला गणवेश आहे.त्या शाळेशी संपर्क साधून गणवेश शिवून विक्री करता येते.आपल्या कौशल्यानुसार कामाचे स्वरूप निवडता येइल.

भरतकाम करणे — कपड्यवर भरत काम करून कपड्यचा दर्जा वाढविता येतो. भारतीय भरतकलेचे टाके मांजर विविधता आणि सुंदरता याचा संगम आहे. आपल्याला अवगत असलेल्या काही टाक्यांवर विशेष सराव करावा. यातून स्वयंरोजगाराबरोबर दुसर्यांना देखील रोजगार उपलब्ध करून देता येतो. ग्रहविज्ञानाचे शिक्षण घेतलेली ग्रहिणी प्रांतीय भरतकलेचे टाके शिकलेल्या असतात.साड्य भरून देणे ,चादरी भरून देणे, लहान मुलांच्या कपड्यंवर नाजूक डिझाईन भरणे. अशाप्रकारे सौंदर्यप्राप्ती आणि आनंद निर्मिती या स्वयंरोजगारातून प्राप्त करता येते तसेच आर्थिक प्राप्ती.

(पपप) फॅशन डिझाइनर रू विविधता आणि कौशल्य याचा मेळ म्हणजे फॅशन डिझाईन होय. व्यक्ती आहे त्यापेक्षा अधिक चांगली स्वत:ला प्रेझेंट करीत असते. व्यक्तिमत्त्वाची छाप निर्माण करण्यास फॅशन डिझाईन हा स्वयंरोजगार उत्तम ठरतो. कारण फॅशननुसार किंवा नवीन पॅटर्न कपडा— शिलाईत टाकणे यामुळे फॅशन निर्मिती होते. फॅशन सतत बदलत असते.म्हणून स्वयंरोजगाराच्या दृष्टीने उत्तम आहे.स्वयंरोजगारात चांगला गम जम बसू शकतो. अलीकडे कपडे शिलाई फार वाढलेली आहे.या संधीचा फायदा घेता येईल. कमी श्रमात अधिक पैसा मिळवण्यास हा व्यवसाय उत्तम आहे. ब्लाउजमधील सर्व चंजजमतद शिवता येणे या सारख्या स्वयंरोजगार दुसरा कोणता असू शकेल?

(पअ) समारंभासाठी लागणारे कपडे आणि कलाकुसरीच्या वस्तू तयार करणेरू लग्न,मुंज,बारसे, इ.

समारंभासाठी विशिष्ट वस्तू व कपडे आवश्यक असतात .हा स्वयंरोजगार उत्तम होऊ शकतो. लहान मुलांचे स्वेटर, लंगोट, झबले ही आवश्यक बाब आहे.लंगोट, झबले, स्वेटर टोपर अशा चारच वस्तू घेऊन स्वयंरोजगार केल्यास चांगला चालतो.

(अ) वस्त्र छपाई — वस्त्र छपाईमुळे विविधता आणता येते. ग्रहविज्ञान शिक्षणात

बारीक प्रिंट,स्प्रे—प्रिंटींग,बांधणी,साच्या छपाई इ. पद्धतींचा समावेश आहे. ग्रहविज्ञान शिक्षण घेतलेली विद्यार्थीनी या छपाईच्या विविध पद्धतींचा वापर करून साध्य करू शकते. चादरी याशिवाय स्कार्प इ.हा स्वयंरोजगार चांगला जम बसवू शकतो.

## संदर्भ सूची :-

१) पोषण आणि आहार , प्रा.सौ शोभा वाघमारे (नाईक)शशिकांत पिंपळापुरे विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा,औरंगाबाद —जून २००८, पृष्ठ. क्र.— २०

२. पृष्ठ. क्र. २१

३. आहारशास्त्राची मूलतत्वे प्रा.डॉ.स्नेहा महाजनी श्री मंगेश प्रकाशन नागपूर १९९ ते २२०

४. पृष्ठ. क्र. २२१

५. मानवी पोषण व आहारशास्त्राची मूलतत्वे डॉ.आशा देऊस्कर विद्या प्रकाशन नागपूर २३५

६. पोषण आणि आहार प्रा.सौ.शोभा वाघमारे पश्ष्ठ. क्र. २१

७. आहार उपचार आणि सामुदायिक पोषण प्रा. सौ.शोभा वाघमारे विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा, औरंगाबाद पश्ष्ठ. क्र. १२७

८. इंटरनेटवर मिळणारी माहिती.